**International Journal of Law, Management and Social Science** **ISSN: 2581-3498**

Vol. 6, Issue III, Jul-Sep, 2022 http://bharatpublication.com/journal-detail.php?jID=35/IJLML

# A SHORT STUDY OF EPISTLE TO EPHESIANS (1:1-2) BY APOSTLE PAUL WITH HIS FOURFOLD VIEW ABOUT THE CHURCH AS A COMMUNITY

**Prof. Rev. Gladwin Emmanuel Jaykar**

*(B.Th./C.A.V./B.A./B.D./G.D.Th./M.A.)*
*21, Aashirvad Colony, Taloda Road*
*NANDURBAR, Maharashtra State, India*

# प्रेषित पौलाच्या इफिसकरांस पत्रातील (1:1-2) मंडळीसंबंधी चौपदरी दृष्टीकोनाचे अध्ययन.

---

## ABSTRACT

*Saul, "who was also called Paul," (Acts 13:9) hailed from the city of Tarsus in Cilicia. He was a staunch Jew but had also become "an apostle for the Gentiles." The city of Tarsus was a capitol city of the region. The commerce of wood and clothes made from threads of the hairs of the camels and goats were chief thriving business for making tenets and cloths. So Apostle Paul had learned the skill of tent making in this city of Tarsus. He had become an ardent opponent of the Way of Christ and His followers. He used to chase them and even kill them if necessary. One day Jesus Christ met him on the way to Damascus and here Saul decided to become a follower and the Apostle of the Lord Jesus Christ. He who was an enemy of the Way of Christ Jesus became the preacher of the Way of Christ and His teachings. After his conversion, Apostle began to tour the Roman Empire to preach the good news of Lord Jesus Christ and wrote many letters to the churches which were established in the different regions of the Roman Empire. One of the letters he wrote was to the church at Ephesus. There were some issues and problems the new community was facing regarding its faith and practice. The false teachers tried to derail and disturb the community. Apostle Paul teaches them in the opening chapter 1:1-2 of the Letter to the Ephesians the fourfold perspective of the church that it is the Community of Saints or Holy People, Community of Faith, Community of Grace and the Community of Peace. By stating these perspectives, he encourages them to demonstrate these four characteristics to the neighbors and communities.*

## सारांश:

शौल तार्सकर "ज्याला पौलही म्हणत" **(Acts.**13:9**)** तो किलीकीयतील तार्स शहराचा रहिवासी होता. हा कट्टर यहूदी असुनसुध्दा त्याला *"विदेश्यांचा महान* ***प्रेषित"*** असेही म्हणतात. तार्स शहर एक व्यापारी शहर होते व हे शहर किलीकीया प्रांताची राजधानी होती. येथे ***"ग्रीक व सीरीयन राजांच्या राजवटीत*** *इमारती*

*लाकडे, ताग यांचा मोठा व्यापार चाले. तसेच उंटांच्या व बक-यांच्या केसाचे जाडे भरडे कापड करण्याचा व्यवसायही होता."* (गोठोस्कर/पा.281) (**Acts.**18:3) हे शहर पूर्व आणि पश्चिम अशा दोनही विचारांचे मिलन केंद्र बनले होते. या शहरामध्ये व्यापारासोबत राहूटया बनविण्याचा व्यवसायही चाले कारण की *"त्यासाठी उंट व बक-यांच्या केसाचे* ***कापड***[1] *उपलब्ध होते."* (गोठोस्कर/ पा.181) प्रेषित पौल स्वत: **राहूटया बनविण्याच्या व्यवसाय** कुशलतेने करीत होता. पौल हा ***रोमी नागरीक*** होता. तरीसुध्दा त्याला जेंव्हा जेंव्हा सुवार्तेच्या सेवेत अडथळा किंवा विरोध झाला, *"तेंव्हा त्याने हे* ***नागरिकत्व*** [2] *एखद्या ढालीप्रमाणे पुढे करुन विरोधकांना गप्प बसविले"* असे दिसते. (गोठोस्कर/पा.281) पौल हा आरंभी येशू ख्रिस्ताच्या मार्गाचा व त्याच्या अनुयायांचा अतोनात विरोध करित होता आणि छळ करुन देहांत शिक्षा देत होता. तसेच तो पाठलाग आणि हैराण करीत असे. (**Acts.**22:3-5, 26:9-11) तो इतका चवताळला होता की **लेखक लूक**[3] म्हणतो की, *"शौल अजूनही प्रभुच्या शिष्यांना धमक्या देणे व त्यांचा घात करणे ह्यांच्याविषयीचे "****फूत्कार*** *टाकीत होता."* (**Acts.**9:1) हा कट्टर विरोधक व व्देषाने पेटलेला यहूदी तरुण शौल अचानक एके दिवशी दिमिष्कच्या रस्त्यावर असतांना भरदुपारी झालेल्या प्रभु येशूच्या **अलौकिक दर्शनाने** बदलून गेला. तो येशूचा अनुयायी लगेचच बनला. ज्या येशूच्या मार्गाचा व त्यावर चालणा-या लोकांचा त्याने विरोध व उपहास करुन आवाज शांत करण्याचा प्रयत्न केला तोच शौल येशू ख्रिस्ताच्या सुवार्तेच्या **घोषणेचा प्रणेता उद्घोषक व प्रेषित**[4] बनला. (Dake/p.247) प्रेषित (Strong/g/652) म्हणजे विशिष्ट कामगीरीसाठी पाठविलेला, पाठविणा-याचे प्रतिनिधित्व करणारा व प्रमुख संदेशवाहक. प्रेषित हा शब्द नव्या करारामध्ये 81 वेळेस आढळतो. जे पौलाच्या दृष्टीने उपहास आणि किळसवाणे होते तेच या परिवर्तनामुळे आकर्षण आणि प्रशंसेस (Philippians 3:7-11) पात्र ठरले. त्याचे हे परिवर्तन जसे आध्यात्मिक होते तसेच ते सामाजिक आणि वैचारिकही होते. समजलेल्या सत्यासाठी तो कुठलिही किंमत देण्यास तयार झाला. तो यहूदी व परराष्ट्रीय यांचा संधाता बनला आणि मंडळी म्हणजे चर्च काय आहे हे त्याने मोठया प्रकर्षाने त्याच्या बोलण्याव्दारे (केरुग्मा व डीडाखे) आणि पत्र शिक्षण लिखाणांव्दारे सप्रमाण सिध्द केले. ख्रिस्ताच्या मार्गावर चालण्यास निघालेले लोक "देवाचे घर आणि देवाचे कुटुंब[5] आहेत" (गोठोस्कर/पा.108) आणि तसेच त्यांची नवी समाजरचना (घराणे व गृहसंहिता हाऊसहोल्ड आणि ह्युस्टाफेल) चार महत्वपूर्ण घटकांनी सजविलेली आहे असे या इफिसकरांस पत्रामध्ये (Ephesians. 1:1-10) त्याने मांडले आहे. तो म्हणतो, *"मंडळी म्हणजे देवाचे पवित्र, विश्वास ठेवणारे, कृपा प्राप्त आणि शांती प्राप्त लोक आहेत."*

प्रेषित पौलाचा दृष्टीकोन असा की ख्रिस्ताची मंडळी ही नवा समाज आहे आणि तो समाज "पवित्र, विश्वास, कृपा, शांति" समाज आहे हे त्यांनी समजून घ्यावे. या चार वैशिष्टयांनी भरलेला हा नवा समाज म्हणजेच देवाने निर्माण केलेली येशू ख्रिस्ताची मंडळी आहे हे त्यांच्या लक्षात यावे. या वैशिष्टयपुर्ण गुणलक्षणांमुळे त्यांचे शेजारी प्रभावित झाले होते यात नवलच नाही. प्रेषित पौल यासंबंधी इफिसकरांस

पत्राच्या प्रारंभिक प्रेषितीय अभिवादनामध्ये (Ephesians.1:1-2) यांचा उल्लेख करुन मंडळीला तो प्रोत्साहन देतो.

**1.** इफिसच्या मंडळीची चार वैशिष्टये: मंडळीकडे पाहाण्याचा दृष्टीकोन: Ephesians. 1:1

प्रेषित पौल मंडळीकडे पाहातांना येशू ख्रिस्तामध्ये आज मंडळीचे स्थान आणि महत्व काय आहे असा भूतकाळाऐवजी तीच्या वर्तमानाचा विचार करतो. तरी तीच्या भविष्यातील आशेविषयी म्हणजे तीला प्राप्त होणारे अविनाशी गौरव जे तीला येशू ख्रिस्ताव्दारे देण्यात येईल ते पाहून देवाचा धन्यवाद करतो. पौलास जसे वेगळे करण्यात आले आहे तसेच मंडळीलासुध्दा देवाने वेगळे केले आहे यावर तो विश्वास ठेवतो आणि समाधान व्यक्त करतो. या पत्र लिखाणावेळी तो रोमच्या कैदेत होता. कदाचित त्याला त्याच्या शेवटाचा अंदाच आला होता. अशावेळी तो स्वत:संबंधाने सांगू शकला की, *"कारण आता माझे अर्पण होत आहे, आणि माझा प्रयाणकाळ जवळ आला आहे. जे सुयुध्द ते मी केले आहे,मी धाव संपविली आहे, विश्वास राखीला आहे."* (2 Timothy 4:6-7) त्याचप्रकारे मंडळीने नेमूण दिलेला मार्ग किंवा धाव सोडू नये तर ती पूर्णही करावी अशी अपेक्षा तो बाळगितो.

**क.** मंडळी ही देवाचे "पवित्र" केलेल्या लोकांचा समाज आहे.

मंडळीचे विश्वासणारे लोक हे संत अथवा पवित्र जन म्हणजे असे लोक की जे पापाच्या बंधनातून कायमस्वरुपी सोडविले गेले व येशूमध्ये मुक्ती पावलेले आहेत. ही पापमुक्ती प्रभु येशूवरील विश्वासाने कर्मे केल्यांवाचून देवाच्या कृपेने त्यांना मिळाली आहे.

**1)** मुळ ग्रीक भाषेतिल "संत किंवा पवित्र जन" संकल्पना खालिलप्रमाणे आहे:

***1.*** **एक** हे की म्हणजे "हेगीयॉस" या शब्दाने ही संकल्पना मांडली आहे. (Strong/g/40) तर "हेगीयॉझो" या शब्दाने हे पवित्र लोक आता पवित्र मंदिरामधील लोक बनविण्यात आलेले लोक होत या अर्थाने हा शब्द वापरला आहे. (Strong/g/40, W.E.Vine/p.318) या दोनही शब्दांना जोडल्याचा अर्थ हा की जे *"पवित्र करुन (विकत घेऊन व शुध्द करुन) वेगळे केलेले आहेत असे लोक". (**Acts.** 20:28)*

2. **दुसरे** असे की या मुक्ती पावलेल्या जनांना नुसतेच पवित्र जन बनण्यासाठी नव्हे तर ते देवाच्या पाचारणानेच वेगळे केल्यामुळे पवित्र ठरविले जाण्यासाठी बोलविले आहे. त्यांचे शुध्दिकरण सतत होत राहील व भविष्यामध्ये स्वर्गराज्यात ते जयोत्सवाने प्रवेश करतील.
3. **तीसरे** असे की पापाचा (एक वचनी) पश्चात्ताप करुन येशूवर विश्वास ठेवून त्याच्या रक्ताव्दारे "खंडणी भरुन" देऊ केलेली पापक्षमा त्यांनी स्वीकारली आहे व देवाला शरण जाऊन येशू ख्रिस्ताला प्रभु मानले आहे. ते येशूच्या वधस्तंभावरील उध्दारकार्याव्दारेच पवित्र जन झालेले आहेत. येशूमध्येच हे उध्दारकार्य पूर्णत्वास येते. ("येशूमध्ये" किंवा "ख्रिस्तामध्ये" हा शब्द पौलाने वारंवार म्हणजे त्याच्या 11 पत्रांमध्ये **83 वेळेस**[6] वापरला आहे. (NKJV) (www.answers.com) प्रेषित पौलाची अशी विचारसरणी असल्यामुळे "पवित्र जन" ही संकल्पना समजणे गरजेचे ठरते.

ही खंडणी भरुन आप्ताला सोडविण्याचा अधिकार फक्त जवळच्या आप्तांना होता. याचे **एक** उदाहरण जुन्या करारामधील रुथ या ग्रंथातिल रुथ आणि बवाज यांचे घेता येईल. याला सिंध्दान्त शिक्षणामध्ये "किन्समन रीडेम्पशन थीअरी" असे म्हणतात. जसा बवाज रुथेचा आप्त म्हणजे "गोएल" झाला आणि त्याने किंमत भरुन रुथेस तीच्या वतनासह खंडूण घेतले. रुथेस बवाज म्हणाला की, *"मी तुझे वतन सोडवावयाजोगा जवळचा आप्त आहे खरा,"* आणि नंतर बवाजाने समाजाच्या नियमानुसार वतन खरेदी केले. कारण मवाब देशाहून नामी आली होती व ती बवाजाचा आप्त अलिमलेख याच्या *"शेताचा वतनभाग विकण्यास काढीत होती"* (Ruth 4:3) हे बवाजास कळले. बवाजाने आप्त म्हणुन शेत आणि रुथ वतनादाखल विकत घेतले. त्याचप्रकारे येशू ख्रिस्त आपल्यासाठी देहाने आप्त झाला आणि त्याने स्वप्राणाने वधस्तंभावर खंडणी भरुन मानवाला सोडविले. (Ruth. 4:9-17) रुथ ही मवाबी स्त्री होती. ती एफ्राथी अलिमलेख याच्या एका मुलामुळे विदेशी व कराराबाहेरची असुनही देवाची कृपा पावली. पौल असे सांगतो की, *"म्हणुन आठवण करा की, तुम्ही पूर्वी देहाने परराष्ट्रीय आणि ज्याची सुंता हाताने केलेली म्हणजे देहाची आहे स्वतःला सुंती म्हणविणा-या लोकांकडून बेसुंती म्हणविले जाणारे होतां; ते तुम्ही त्या वेळेस ख्रिस्तविरहीत, इस्राएलाच्या राष्ट्राबाहेरचे,*

*वचनाच्या करारांस परके, आशाहीन व देवविरहीत असे जगांत होतां;"* (Ephesians. 2:11-12) अशा परिस्थितीत देव, *"आपल्या सत्संकल्पाची अचलता अभिवचनाव्दारे वतनदारांना दाखवावी ह्या ईच्छेने शपथेव्दारे मध्ये पडला."* (Ephesians.1:5,9,11, Hebrews. 2:5-18,6:13-20)

**दुसरे** असे की या मुक्ती पावलेल्या जनांना पवित्र जन बनविण्यासाठीच नव्हे तर ते देवाच्या पाचारणानेच वेगळे केल्यामुळे पवित्र ठरविले गेले म्हणुन पवित्र वतन असे त्यांना संबांधिले आहे. **तीसरे** असे की ज्यांनी पापाचा पश्चात्ताप करुन येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवला त्यांनी त्याच्या रक्ताव्दारे देऊं केलेली क्षमा मिळविली आहे. देवाला शरण जाऊन येशू ख्रिस्ताला त्यांनी प्रभु मानल्यामुळे आता ते "येशूमध्ये" त्याच्या वधस्तंभावरील उध्दारकार्यामुळे त्याच्या कृपेने पवित्र जन झाले आहेत. परंतू फरक हा आहे की ही कृपा कोणासही कर्माने प्राप्त होत नाही आणि पाप केले म्हणुनही तीच्यावर पापाचा पश्चात्ताप न करता हक्क गाजविता येत नाही. देवाने येशूच्या रक्ताव्दारे त्याच्यावर विश्वास ठेवणा-यांना "पवित्र जन" बनविले आहे. **The Church is a Holy Community.**

**ख**. मंडळी ही येशू ख्रिस्तावर "विश्वास" ठेवणा-या लोकांचा समाज आहे:

देवाने ज्यांना पापातून सोडविले तो देव आता ज्यांची सुटका झाली आहे अशा सर्वांचा पिता (ग्रीक भाषेमध्ये "पाटेर") झाला आहे. जसा तो प्रेषितांचा तसाच तो येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणा-यांचासुध्दा पिता आहे. ("पाटेर"-Strong/g/3962) देव सर्वांचा निर्माणकर्ता आहे (τον Κτισαντα–Strong/g/2937 The God who having Created. Romans.1:25 ) तरी तो सर्वांचा पिता नाही हे लक्षात ठेवावे. विश्वासाचे सर्वसामायिकत्व आपल्या मंडळीत असणा-या बंधुभावाचा आधार आहे. त्यामुळे सर्व विश्वासणारे स्वर्गीय वतनाचेही सामायिक भागिदार आहेत. प्रभु येशू ख्रिस्त हा स्वत: देव आहे ही ईश्वरविज्ञानाची संकल्पना समजण्यास कठीण आहे. पौल म्हणतो की, "देव आपला प्रभु येशू ख्रिस्त" (ग्रीकमध्ये-कुरीयोन येसू ख्रिस्टॉन) यावरील विश्वासाने तारणप्राप्ति होते. (Strong/g/1962) कारण की प्रभु येशू ख्रिस्त हा देव तसाच मानवाकडे पाठविण्यात आलेला "मशीहा" सुध्दा आहे. तो आपला तारणारा देव व विश्वासणा-यांचा प्रभु

देखिल आहे.(ग्रीकमध्ये "कुरीयॉन") हे लोक मंडळीमध्ये असून ते आता या प्रभुच्या रक्ताने विकत घेतलेले आहेत. विकत घेण्यात आल्यामुळे ते आता तारण म्हणजे देवाची स्वत:ची मिळकत झाले आहेत. ही मिळकत आता देवाचे ऐश्वर्य आहे आणि त्याचे मोल हे येशूचे मुल्यवान रक्त आहे. ऐश्वर्यसंपन्नता येशूच्या रक्तचे मोल दर्शविते. याकरिता पौल असे सांगतो की मंडळी ही या मुल्यवान लोकांच्या मुल्यवान विश्वास बाळगणा-या लोकांचा समुह आहे. सारांश हा की येशूचे रक्त मुल्यवान आहे त्यामुळे त्यावर विश्वास ठेवणारेसुध्दा लोकसुध्दा मुल्यवान ठरले आहेत आणि त्यामुळे त्यांचा विश्वाससुध्दा मुल्यवान ठरला आहे. **The Church is a Faith Community.**

ग. मंडळी ही देवाची "कृपा" प्राप्त केलेल्या लोकांचा समाज आहे :

**1)** देवाची कृपा हा प्रेषित पौलाचा एक अनोखा विचार आहे.

*"नियमशास्त्र व कृपा यांच्यातील संबंध हा पौलच्या बहूतेक पत्रांतला विषय आहे."*[7]

**(गोठोस्कर/पा.111-112)** Romans.5:1,15-17,8:1-2, Ephesians. 2:8,9

**2)** देवाची कृपा म्हणजे नेमके काय?

दयेस मुळीच पात्र नसतांना ख्रिस्ताने पाप्यांवर दया केली. त्यातल्या त्यात ज्यांनी येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवला आणि तारण प्राप्त केले आहे त्यांनी, "ख्रिस्ती जीवनात टिकून राहण्यासाठी विश्वासणा-याला आधार आहे तो कृपेचा." पवित्र बायबलनुसार कृपा म्हणजे दयेस अपात्र अशा व्यक्तीवर केलेली दया.

**3)** देवाची कृपा आणि पापक्षमा तथा तारणाचा संबंध काय?

येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवण्याने "विश्वासणा-यांचे सार्वकालिक तारण करणे एवढेच देवाच्या कृपेचे प्राथमिक कार्य नाही, तर संपूर्ण ख्रिस्ती जीवनाचा आधार व पाया कृपा हाच आहे. कृपा हे तारण झाल्याचे चिन्ह अथवा पुरावा आहे." प्रेषित पौल याविषयी करिंथच्या मंडळीला लिहीतो की, *"तो अनुग्रह हा की, जसजशी ख्रिस्ताविषयीची साक्ष तुम्हांमध्ये दृढमूल झाली तसतसे तुम्ही त्याच्याठायी प्रत्येक बाबतीत सर्व बोलण्यात व सर्व ज्ञानांत संपन्न झालां;"* **(**1Corinthians. 1:5**)** प्रेषित पौल पुढे हेसुध्दा सांगतो की, *"त्याच्या कृपेच्या समृध्दीप्रमाणे त्या प्रियकराच्या ठायी,*

*त्याच्या रक्ताच्या व्दारे खंडणी भरुन मिळवलेली मुक्ती, म्हणजे आपल्या अपराधांची क्षमा, आपल्याला मिळाली आहे."* **(**Ephesians.1:7**)**

**4)** देवाची कृपा कां देण्यात आली व तीची मर्यादा काय?

पवित्र धर्मशास्त्र बायबलनुसार मानवाने पाप केल्यामुळे तो सार्वकालिक दंडास पात्र ठरला होता. मोशेच्या नियमशास्त्रानुसार त्याच्यावर दया करण्यात आली परंतू तरी तो स्वत:ला पापापासून व त्याच्या बंधनातून सर्वकाळांसाठी सोडवू शकला नाही. देवाने त्याला वाचवावे म्हणुन यज्ञ व कर्मकांड लावून दिले तरी ते तात्पुरता उपाय ठरले. काळाच्या शेवटी देवाने स्वत:च्या पुत्राला म्हणजे येशू ख्रिस्ताला उध्दारक म्हणुन पाठविले आणि कृपेचा मार्ग दाचाविला. योहान शुभवर्तमानकार म्हणतो की, *"त्याच्या (येशू ख्रिस्ताच्या) पूर्णतेतून आपणां सर्वांना कृपेवर कृपा मिळाली आहे."* **(**Gospel of John 1:17**)** प्रभु येशू ख्रिस्ताव्दारे देवाने एक नवा मार्ग खुला केला. स्वकर्माऐवजी येशूवरील विश्वासाव्दारे सर्वाना तारण देऊ केले. यालाच सार्वकालिक किंवा स्वर्गीय जीवन असे म्हणतात. या "स्वर्गीय जीवनाचा स्वीकार करण्याची पात्रता म्हणजे कृपा." प्रेषित पेत्र त्याच्या पत्रामध्ये लिहीतो की, *"ज्या संदेष्टयांनी तुम्हांवर होणा-या कृपेविषयी पूर्वी सांगितले, त्यांनी त्या तारणाविषयी बारकाईने शोध केला."* **(**1Peter 1:10, गोठोस्कर/पा.112**)** यापुढे येशू ख्रिस्ताशिवाय तारणच नाही असे पौलाचे म्हणणे आहे. परंतू याला काळाची मर्यादा घालण्यात आली आहे कारण मानवाचा न्याय होणार आहे. जोपर्यंत कृपेचा काळ आहे तोपर्यंत मानवाने तारण साधून घ्यावे अशी देवाची ईच्छा आहे. ज्या सर्वांनी या कृपेचा पत्कर केला आहे ते सर्व देवाचा "कृपा समाज" व देवाचे लोक आहेत. त्यांना आता कृपा मिळाली आहे. मंडळीला देण्यात आलेली दुहेरी कृपा[8] (12 Times in Epistle/Dakes/p.364-d) आणि दुहेरी शांती हा पौलाचा एक महत्वाचा विचार आहे. देव जो पिता याच्यापासून आणि प्रभु येशू ख्रिस्त याच्यापासून कृपा म्हणजे ग्रीक भाषेमध्ये खारीस-(Χαρισ) म्हणजे पात्रता अथवा लायकी नसतांना आपल्यावर झालेली मेहेरनजर, मेहेरबानी किंवा प्रेमयुक्त दया. (Deuteronomy 9:5, Daniel.9:18) ही आपल्याला विनामुल्य देण्यात आली आहे. **(**Psalms 84:11**)** ही आपल्याला सेवेच्या सक्षमिकरणासाठी आहे. **(**1Corinthian.3:10,15:10**)** ही कृपा आपल्याला सात्विक व साधे जिवन

जगण्यासाठी आहे. (2 Corinthian.1:12) ही कृपा आपल्याला स्वार्थासाठी देण्यात आलेली नाही. (1Peter 4:10) ही कृपा नम्र जनांना देण्यात आली आहे. (1 Peter. 5:5) ही कृपा आपण व्यर्थ करुं नये (2Corinthian.6:1, Galatians.2:21) लक्षात असावे की ही कृपा आपल्याला तारणासाठी देण्यात आलेली आहे. (Acts.15:11, Romans. 3:24) **The Church is a Grace Community.**

**घ. मंडळी ही देवाची “शांति” प्राप्त केलेल्या लोकांचा समाज आहे:**

देव जसा अनादि अनंत आहे तशीच त्याची शांतिदेखील “सर्व बुध्दिसामर्थ्याच्या पलीकडे” आहे. (Philippians. 4:7) देवाने येशूव्दारे आपल्यावर कृपा केली आहे आणि त्याची शांति आपल्याला दिली आहे. म्हणुन प्रेषित पौलास वाटते की, *“ख्रिस्ताची शांति तुमच्या (म्हणजे कलस्सैकरांच्या) अंत:करणात राज्य करो.”* तसे झाल्यास देवाने दिलेली शांति विश्वासणा-यांची अंत:करणे व विचार सुरक्षित ठेविल. या शांतिच्या बंधनाने ऐक्य टिकते. येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर त्याच्या *“देहाने वैर नाहिसे केले,”* (Ephesians.2:15) तोच आमची शांती आहे आणि त्यामुळे त्याने दोघांना म्हणजे *“यहूदी व यहूदीतरांना”* एक केले आणि *मधली आडभिंत पाडली.” “आणि त्याने येऊन जे तुम्ही (यहूदीतर) दूर होतां त्या तुम्हाला शांतीची सुवार्ता सांगितली व जे जवळ (यहूदी) होते त्यांनाही शांतीची सुवार्ता सांगितली.”* (Ephesians. 2:15) येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणारे एका शरीराचे अवयव झाले आहेत कारण की आता त्यांच्यात शांती प्रस्थापित झाली आहे. शांती प्राप्त केलेले लोक नवा “शांती समाज” बनले.

देव जो पिता त्याच्यापासून आणि प्रभु येशू ख्रिस्त त्याच्यापासून शांति: एइरेने-Ειρηνη व (Strong/g/1515) शालोम[9] “shalom” या इब्री संकल्पनेप्रमाणे हा शब्दप्रयोग आलेला आहे. त्याचा अर्थ, परिपूर्णता, सर्वांगिण स्वास्थ्य, आणि जुन्या कराराच्या संकेतानुसार शांत्यर्पणाच्या विधीनुसार तारणासाठी अर्पण झाल्याने दंडातून सुटल्याचा अनुभव आल्यावर प्राप्त झालेली स्वस्थ मन:स्थिती. देव हा शांतिदाता देव आहे म्हणुन त्याने ही शांति येशू ख्रिस्ताच्या तारणदायी अर्पणाव्दारे त्याच्यावर विश्वास ठेवणा-याच्या पाप व पापाच्या सार्वकालिक दंडास दूर सारुन प्रदान केली आहे. (Romans.

15:33, 1Thessalonica. 5:23) प्रेषित पौल मंडळीकडे पाहून हर्षभराने देवाचा धन्यवाद करतो. तो मंडळीला देवाने दिलेल्या कृपेसाठी आणि शांतिसाठी विश्वासपूर्वक त्याच्या प्रार्थनेत उचलून धरतो. यावरुन असे दिसते की देवाची मंडळी ही देवाचा शांतिसमाज आहे. **The Church is a Peace Community.**

महत्वाचे शब्द स्पष्टीकरण सुचि:

**क**) देव आपला पिता[10] (हेमोन पाटेर थीओउ) हा शब्दप्रयोग किमान 12 वेळा आलेला आहे. (12 Times in Epistle/Dakes/p.364-d) ज्या देवाने त्यांना पापातून सोडविले तो आता सुटलेल्या सर्वांचा पिता बनला आहे. जसा तो प्रेषितांचा तसाच तो विश्वासणा-यांचासुध्दा पिता बनला आहे. देव सर्वांचा निर्माता जरी आहे तो सर्वांचा पिता नाही हे समजण्यासाठी प्रेषित पौल हा फरक स्पष्ट करीत आहे. विश्वासाचे सर्वसामायिकत्व आपल्या मंडळीमध्ये असणा-या बंधुभावाचा आधार आहे. सामायिकत्वामुळे स्वर्गीय वतनाचेही सर्व विश्वासणारे सामुहिकरीत्या भागिदार आहेत.

**ख**) देव आपला प्रभु येशू ख्रिस्तः कुरीओन येसू ख्रिस्टू (Strong/g/1962) प्रभु येशू ख्रिस्त देव आहे व तसाच तो देवाने पाठविलेला ख्रिस्त म्हणजे मशीहासुध्दा आहे. हा आपला तारणारा देव येशू ख्रिस्त विश्वासणा-यांचाही प्रभु (कुरीऑन) आहे. मंडळी आता त्याच्या रक्ताव्दारे विकत घेतलेले लोक आहेत. हे रक्ताव्दारे विकत घेतलेले लोक आता त्याची संपत्ती आहेत.

तो त्यांचा धनी आहे. देवाने मंडळीला दुहेरी कृपा व शांति दिली आहे.

**ग**) ज्या देवाने हे घडवून आणले आहे त्याला धन्यवाद देणे फार चांगले आहे. प्रेषित पौल

मंडळीकडे पाहून हर्षभराने देवाचा धन्यवाद करतो. तो मंडळीला देवाने दिलेल्या कृपेसाठी आणि शांतिसाठी विश्वासाने प्रार्थनेमध्ये उचलून धरतो. पौल त्याच्या पत्रांमध्ये किमान 40 वेळेस[11] असे लिहीतो. (Dake Bible/p.364-e)

**घ**. विश्वासणारा स्वर्गीय स्थानांमध्ये आशिर्वादित आहे.[12] Ephesians. 1:3-10 (Dake Bible/p.373-g) येशू ख्रिस्तामध्ये देवाने स्वर्गातिल सर्व आध्यात्मिक (ऐहीक नव्हे) आशिर्वाद दिलेले आहेत. देवाने त्याच्या लेकरांना सर्व आशिर्वादांनी आशिर्वादित केले एवढेच नव्हे तर त्यांना जगाच्या स्थापनेपूर्विच निवडून घेतले आहे. देवाने ख्रिस्तामध्ये त्याचे दत्तक पुत्र व कन्या होण्याकरीतां त्यांना पूर्वीच प्रेमाने नेमले

आहे. देवाने आता त्यांच्यावर त्याची कृपा विपूलतेने केली आहे. त्यातल्या त्यात ख्रिस्त प्रियकरामध्ये त्याच्या रक्ताव्दारे खंडणी भरुन मिळविलेली मुक्ती म्हणजे अपराधांची क्षमा दिली आहे. त्याच्यामध्ये त्याने सर्व ज्ञान व बुध्दि यांसह त्यांच्यावर कृपा विपूलतेने केली आहे. देवाने त्याच्या सत्संकल्पाचे रहस्य त्याच्याच इच्छेने विश्वासणा-यांना कळविले आहे. हा संकल्प म्हणजे "*कालखंडाच्या पुर्णतची व्यवस्था लावतांना स्वर्गांत व पृथ्वीवर जे आहे ते सर्व ख्रिस्तामध्ये एकत्र करावे.*" ***(***Ephesians. *1:10)*

च. तो ख्रिस्तामध्ये वतनदार कसा आहे: Ephesians. 1:11-14

देव आपल्या मनाच्या संकल्पाप्रमाणे सर्व काही चालवितो. त्याच्या संकल्पामधील योजनेमध्ये विश्वासणारे पुर्विच नेमलेले आहेत. **(**Ephesians. 1:11**)** ख्रिस्ताच्या ठायी विश्वासणारे वतनदार[13] झाले आहेत. ({ÉÉ½þÉ: Dake/Dt.20,p.340-e & Ephesians. p.364) हे सर्व त्याच्या गौरवाच्या स्तुतिसाठी व्हावे म्हणुन झाले. मंडळीच्या विश्वासणा-यांनी पूर्विच ख्रिस्तावर आशा ठेवली आहे. त्याच्या गौरवाच्या स्तुतिसाठी हा शब्दप्रयोग 3 वेळा आला आहे: **(**Ephesians. 1:6,12,14**)**

**छ.** सत्याच्या वचनानें म्हणजे तारणाविषयीची सुवार्ता ही पवित्र आत्म्याव्दारे प्रकटली:

(Ephesians. 1:13) सुवार्ता ही पवित्र आत्म्याच्याव्दारे प्रकट झाली आणि प्रभावीसुध्दा

ठरली. याच पवित्र आत्म्याव्दारे विश्वासणा-यांवर "शिक्का"[14] मारण्यात आला. (Dake/ Ephesians.1:13/p.365-i) सुवार्तेच्या रहस्याचे ज्ञान व प्रकाश विश्वासणा-यांना मिळाला. सुवार्ता त्याना समजली. ती मिळाल्याने ते अंतर्यामी बलसंपन्न झाले आणि त्यांचा देवाकडे जाण्याचा मार्गसुध्दा प्रशस्त झाला. त्यांना त्यांच्या अंतरंगी ख्रिस्ताची समक्षता लाभली. सुवार्तेमुळे वैश्विक ऐक्याचा प्रारंभ झाला. सुवार्ता लाभल्यामुळे त्यांना सात्विक जिवन जगण्यास प्रेरणा मिळाली. ते उपकारस्मरण व देवाची उपासना करुं लागले. सुवार्तेमुळे त्यांना प्रार्थना व विनवणी करण्यास साहाय्य मिळाले.

त्यांचे जिवन आणि कार्य एकजिव झाले आणि ते इतरांना आदर्श बनण्यासाठी सिध्द झाले. ख्रिस्ताची मंडळी हा त्यांचा नवा समाज आहे आणि त्या समाजामध्ये " पवित्र लोक, विश्वास, कृपा, आणि शांति" भरलेली आहे हे सत्य ते समजू शकले. या चार वैशिष्टयांनी भरलेला हा नवा समाज

म्हणजेच देवाने निर्माण केलेली येशू ख्रिस्ताची मंडळी आहे हे त्यांच्या लक्षात आले. या वैशिष्टयपुर्ण गुणलक्षणांमुळे त्यांचे शेजारी प्रभावित झाले यात नवलच नाही.

**निष्कर्ष:**

1) किलीकीयामधील तार्स या शहरामध्ये व्यापरासोबत राहूटया बनविण्याचा व्यवसायही चाले कारण की[1] *उंट व बक-याच्या केसांचे कापड तेथे उपलब्ध होते."* (Bible Dictionary –Marathi- Gothoskar, Word of Life Publication, Pune, India, P.181)
2) त्याला जेंव्हा जेंव्हा सुवार्तेच्या सेवेत अडथळा किंवा विरोध झाला [2] "*तेंव्हा त्याने हे नागरिकत्व एका ढालीप्रमाणे पुढे करुन विरोधकांना गप्प बसविले*" असे दिसते. (Bible Dictionary –Marathi- Gothoskar, Word of Life Publication, Pune, India, P.281)
3) लेखक लूक म्हणतो की शौल[3] अजूनही प्रभुच्या शिष्यांना धमकी देणे व त्यांचा घात करणे ह्यांच्याविषयीचे फुत्कार टाकित होता. (Acts of the Apostles.9:1)
4) ज्या येशूच्या मार्गाचा व त्यावर चालणाया लोकांचा त्याने विरोध व उपहास क-रणारा तोच शौल येशू ख्रिस्ताच्या सुवार्तेच्या घोषणेचा प्रणेता उद्घोषक व प्रेषित[4] बनला. (Dake Annotated Reference Bible, Dake Publishing Inc. Lawrenceville, Georgia, USA / 2011, p.247)
5) *ख्रिस्ताच्या मार्गावर* चालण्यास निघालेले लोक "*देवाचे घर आणि देवाचे कुटुंब[5] आहे*" (Bible Dictionary –Marathi- Gothoskar, Word of Life Publication, Pune, India, P.108)
6) "येशूमध्ये" किंवा "ख्रिस्तामध्ये" हा शब्द पौलाने वारंवार म्हणजे त्याच्या 11 पत्रांमध्ये 83 वेळेस[6] वापरला आहे. (New Kings James Version-In Christ-www.answers.com)
7) "*नियमशास्त्र व कृपा यांच्यातील संबंध हा पौलच्या बहूतेक पत्रांतला विषय आहे.*"[7] (Bible Dictionary –Marathi- Gothoskar, Word of Life Publication, Pune, India, P.111)
8) मंडळीला देण्यात आलेली दुहेरी कृपा[8] (12 Times in Epistle) आणि दुहेरी शांती हा पौलाचा एक महत्वाचा विचार आहे. (Dake Annotated Reference Bible, Dake Publishing Inc. Lawrenceville, Georgia, USA ,2011/p.364-d)

9) देव जो पिता त्याच्यापासून आणि प्रभु येशू ख्रिस्त त्याच्यापासून शांति[9] : "शांति-एइरेने: Ειρηνη व शालोम "Shalom" या इब्री संकल्पनेप्रमाणे हा शब्दप्रयोग आलेला आहे." (Strong's Expanded Dictionary of Bible Words, Thomas Nelson Publishers, Nashville,USA, Strong/g/1515,)
10) देव आपला पिता[10] (हेमोन पाटेर थीओउ) हा शब्दप्रयोग किमान 12 वेळा आलेला आहे. (Dake Annotated Reference Bible, Dake Publishing Inc. Lawrenceville, Georgia, USA,2011 /p.364-d)
11) पौल त्याच्या पत्रांमध्ये किमान[11] 40 वेळेस असे लिहीतो. (Dake Annotated Reference Bible, Dake Publishing Inc. Lawrenceville, Georgia, USA,2011/p.364-e)
12) विश्वासणारा स्वर्गीय स्थानांमध्ये आशिर्वादित आहे.[12] (Dake Annotated Reference Bible, Dake Publishing Inc. Lawrenceville, Georgia, USA,2011 /p.373-g)
13) वतन व वतनदार[13] (Dake Annotated Reference Bible, Dake Publishing Inc. Lawrenceville, Georgia, USA,2011 /Dt.20,p.340-e & Eph.p.364)
14) **शिक्का:**[14] (Dake Annotated Reference Bible, Dake Publishing Inc. Lawrenceville, Georgia, USA,2011 / Eph.1:13/p.365-i)

## BIBLIOGRAPHY:

1) Bible Dictionary –Marathi- Gothoskar, Word of Life Publication, Pune, India, P.181
2) Dake Annotated Reference Bible, Dake Publishing Inc. Lawrenceville, Georgia, USA / 2011, p.247
3) Marathi Bible (RV) Bible Society of India, Bangalore, India, 2012.
4) New Kings James Version-In Christ-www.answers.com
5) Strong's Expanded Dictionary of Bible Words, Thomas Nelson Publishers, Nashville, USA, Strong/g/1515